Scholars World
INTERNATIONAL PEER REVIEWED REFEREED MULTIDISCIPLINARY JOURNAL OF CONTEMPORARY REASERCH
Impact Factor: 4.433
Online ISSN: 2320-3145, Print ISSN: 2319-5789

"भारतीय राज्यघटनेतील 'सामाजिक न्याय' या संकल्पनेचा विश्लेषणात्मक अभ्यास"

शरद अर्जुन वाघ

सहाय्यक प्राध्यापक, कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, मनमाड

गोषवारा (Abstract):

भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी राज्यघटना असून राष्ट्राची एकता आणि एकात्मता बरोबरच व्यक्तीच्या प्रतिष्ठेलाही यामध्ये प्रचंड महत्व दिलेले दिसून येते. भारतीय राज्यघटनाकारांनी फ्रेंच राज्यक्रांतीच्या स्वातंत्र्य, समता व न्याय यांसारख्या उदात्त तत्त्वांचा राज्यघटनेत समाविष्ट केलेला दिसून येतो. म्हणूनच भारतीय राज्यघटना ही सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय या तत्त्वावर पूर्णपणे आधारित दिसून येते. भारतीय समाज व्यवस्थेतील ऐतिहासिक असमानता, जातीय भेदभाव, आर्थिक विषमता आणि सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी सामाजिक न्याय ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

भारतीय समाज व्यवस्थेत वर्णव्यवस्था निर्माण झाली व नंतरच्या काळात त्याचाच रूपांतर बंदिस्त अशा वेगवेगळ्या जात समूहामध्ये झाले. वरिष्ठ जातींनी कनिष्ठ जातीचे शोषण केले. स्वातंत्र्यानंतर अशा प्रकारच्या सर्व शोषणाला पायबंध घालण्यासाठी भारतीय राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुढाकाराने विविध तरतुदी करण्यात आल्या. त्या अनुषंगाने भारतीय समाजात 'सामाजिक न्याय' प्रस्थापित करण्याचा प्रमाणिक प्रयत्न केला गेला आहे. या संशोधन लेखामध्ये सामाजिक न्याय संकल्पनेचा अर्थ, स्वरूप आणि भारतीय संविधानातील त्याचे स्थान याचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला आहे. भारतीय संविधानातील प्रस्तावना मूलभूत अधिकार राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे तसेच आरक्षणासारख्या उपाययोजनांच्या माध्यमातून सामाजिक न्यायाची अंमलबजावणी कशी केली जाते याचा अभ्यास सदर संशोधन लेखात करण्यात आला आहे.

महत्त्वाचे शब्द (Keyword): सामाजिक न्याय, भारतीय राज्यघटना, समानता, मूलभूत अधिकार, आरक्षण, मार्गदर्शक तत्वे

प्रस्तावना (Introduction):

भारत हा खंडप्राय असलेला व विविधतेने नटलेला देश आहे. भारतात जात, धर्म, भाषा, वर्ग आणि लिंग यांच्या आधारावर ऐतिहासिक विषमता दिसून येते. या प्रचंड प्रमाणात असलेल्या विषमतेमुळे समाजात अन्याय आणि शोषणाची स्थिती निर्माण झालेली आहे. अशा प्रकारच्या शोषणाची परिस्थितीवर मात करता यावी यासाठी भारतीय संविधान तयार करत असताना 'सामाजिक न्याय' हा एक मूलभूत उद्देश ठेवण्यात आला होता. भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेत सामाजिक आर्थिक आणि राजकीय न्याय या तत्त्वांचा स्पष्ट उल्लेख केलेला दिसून येतो. त्यामुळेच राज्यघटना ही केवळ शासन व्यवस्थेचा दस्तावेज नसून ती सामाजिक परिवर्तनाची महत्त्वाचे साधन आहे असे आपण म्हणू शकतो.

भारतीय इतिहासात अनेक समाज घटकांना सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक संधी पासून वंचित राहावे लागले आहे. या परिस्थितीचा विचार करून भारतीय संविधान कर्त्यांनी सामाजिक न्यायाला विशेष महत्त्व दिलेले दिसते. भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायाला भारतीय लोकशाहीचा पाया मानले आहे त्यांच्या मते, "लोकशाही केवळ राजकीय अधिकारापुरती मर्यादित नसून ती सामाजिक आणि आर्थिक समतेवर आधारित असली पाहिजे". भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेत सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय मिळावा हा उद्देश स्पष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे सामाजिक न्याय ही भारतीय राज्यघटनेची एक मूलभूत संकल्पना मानली जाते.

संशोधन पद्धती (Research Methodology):

सदरील शोधनिबंधासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधन कार्य करण्यासाठी प्राथमिक माहिती स्त्रोत म्हणून भारतीय राज्यघटना व सरकारी अहवाल यांचा उपयोग करण्यात आला आहे. तसेच या विषयावर तज्ञांनी लिहिलेले संशोधन लेख, पुस्तके, जर्नल्स यांचा उपयोग दुय्यम माहिती स्त्रोत म्हणून करण्यात आला आहे.

संशोधन उद्दिष्टे (Research objective):-

1. भारताच्या संविधानातील सामाजिक न्यायाशी संबंधित तरतुदींचा अभ्यास करणे.
2. शासनाने सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या उपाययोजनांचे विश्लेषण करणे.

3. भारतीय समाज व्यवस्थेत सामाजिक न्याय समोरील आव्हाने ओळखणे.

संशोधनाची गृहीतके (Hypotheses):-

1. भारतीय संविधानात सामाजिक न्यायाची स्थापना करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
2. भारतीय राज्यघटनेतील विविध तरतुदीमुळे समाजातील दुर्बल घटकांना संरक्षण मिळते.

संशोधनाचे विश्लेषण:-

सामाजिक न्यायाची संकल्पना:-

समाजातील सर्व व्यक्तींना समान संधी, अधिकार आणि सन्मान मिळावा यासाठी केलेली व्यवस्था म्हणजेच 'सामाजिक न्याय' होय. सामाजिक न्यायाचे मुख्य उद्दिष्ट हे समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांना न्याय मिळवून देणे आहे. जॉन रोल्स यांच्या मते, " न्याय म्हणजे समाजातील संसाधनांचे न्याय वितरण होय". सामाजिक न्यायाची प्रमुख तत्वे पुढील प्रमाणे आहेत:

1. समानता- प्रत्येक व्यक्ती जन्मजात समान आहेत.
2. संधीची समानता: प्रत्येक व्यक्तीला आपल्या गुणवत्तेप्रमाणे सर्व ठिकाणी समान संधी उपलब्ध झाली पाहिजे.
3. मानवी प्रतिष्ठा: प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा जपली गेली पाहिजे.
4. सामाजिक सुरक्षा: प्रत्येक व्यक्तीला समाजात सुरक्षित वाटले पाहिजे.
5. शोषणमुक्त समाज: समाजात राहणाऱ्या कोणत्याही घटकाचे, कोणत्याही स्वरूपात शोषण होऊ नये.

भारतीय राज्यघटनेतील सामाजिक न्याय

भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेमध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय प्रस्थापित करण्याचा उद्देश स्पष्ट करण्यात आला आहे.

मूलभूत अधिकार

मूलभूत अधिकार नागरिकांना समानता आणि स्वातंत्र्य प्रदान करतात. सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेत मदत करतात. भारतीय संविधानातील मूलभूत हक्काचे पुढील अनुच्छेद सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेत महत्त्वाचे ठरले आहेत.

अनुच्छेद 14 – कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान असतील, कोणालाही विशेष अधिकार दिले जाणार नाहीत.

अनुच्छेद 15 – कोणत्याही व्यक्तीशी कसल्याही प्रकारचा भेदभाव करण्यास सक्त मनाई असेल.

अनुच्छेद 16 – सरकारी नोकरीमध्ये सर्व व्यक्तींना स्वतःच्या गुणवत्तेप्रमाणे समाविष्ट होण्याची समान संधी असेल.

अनुच्छेद 17 – सर्व प्रकारच्या अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्यात आले असून अस्पृश्यता पाळल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल.

राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे :-

भारतीय राज्यघटनेत शासनकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे देण्यात आली आहेत. या मार्गदर्शक तत्त्वामधून सामाजिक आणि आर्थिक न्याय साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे.

अनुच्छेद 38 – यानुसार सामाजिक न्याय प्रस्थापित करणे शासनाची जबाबदारी असेल.

अनुच्छेद 39 – शासन संपत्तीचे केंद्रीकरण होणार नाही याची काळजी घेऊन पद्धतीने संपत्तीचे समान वितरण करण्याचा प्रयत्न करेल.

अनुच्छेद 46 – सरकार अनुसूचित जाती व जमातीचे शोषणापासून संरक्षण करेल.

सामाजिक न्यायासाठी उपाययोजना:

आरक्षण व्यवस्था:-

हजारो वर्ष शिक्षणापासून वंचित राहिलेल्या सामाजिक घटकांना इतर घटकांच्या बरोबरीने आणण्यासाठी राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी सर्वप्रथम आपल्या संस्थानात आरक्षण व्यवस्था लागू केली. सामाजिक न्यायाची प्रस्थापना करण्यासाठी भारतीय राज्यघटनाकर्त्यांनी राज्यघटनेतही आरक्षणाची व्यवस्था लागू केली. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांना शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण देण्यात आले आहे.

शिक्षणाचा अधिकार:-

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 21A अंतर्गत सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची व्यवस्था शासन करते. शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळण्यासाठी शासनाकडून राखीव जागांची तरतूद ही केलेली आहे.

सामाजिक कल्याणकारी योजना:-

मार्गदर्शक तत्त्वांमध्ये व्यक्त करण्यात आलेली सामाजिक न्यायाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन स्तरावरून विविध वंचित घटकांसाठी वेगवेगळ्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांच्या अनुषंगाने वंचित घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जातो.सरकारने सामाजिक न्याय साध्य करण्यासाठी विविध योजना राबवल्या आहे

सामाजिक न्यायासमोरील आव्हाने:-

भारतीय संविधानात सामाजिक न्यायासाठी अनेक तरतुदी केल्या गेल्या असल्या तरीही काही समस्या अजूनही अस्तित्वात आहेत त्या समस्या पुढील प्रमाणे सांगता येतील-

1. जातीय भेदभाव: भारतात आजही मोठ्या प्रमाणात जातीय भेदभाव पाळला जातो. रोटी - बेटी व्यवहार नेहमी जातीमध्येच होताना दिसतो.

2. आर्थिक विषमता: वर्णव्यवस्थेत वरिष्ठ स्थानी राहिलेल्या जातींच्या तुलनेत वंचित घटकात मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता दिसून येते.

3. शिक्षणातील असमानता: हजारो वर्ष शिक्षणाचा अधिकार नाकारलेले वंचित घटक व पिढ्यानपिढ्या शिक्षण घेतलेला वर्ग यांच्यात आजही मोठ्या प्रमाणात असमानता दिसून येते.

4. महिलांवरील अन्याय: पारंपारिक भारतीय समाजाने महिलांचे स्थान चूल व मूल यांच्या पुरतेच मर्यादित करून त्यांना चार भिंतीच्या आत जीवन जगण्यास भाग पाडले. शिक्षणाचा नाकारला गेलेला अधिकार समाजसुधारकांच्या प्रयत्नांनी उशिरा मिळाला. स्त्रियांवरील अन्याय हे पण सामाजिक न्यायासमोरील महत्त्वाचे आव्हान आहे.

निष्कर्ष:

भारतीय संविधान सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर आधारित असून ते समाजातील दुर्बल घटकांचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. संविधानातील प्रस्तावना, मूलभूत अधिकार आणि राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वामधून सामाजिक न्याय साध्य करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. परंतु सामाजिक न्यायाची पूर्णपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रभावी प्रशासन सामाजिक जागरूकता आणि शिक्षण आवश्यक आहे समाजातील सर्व घटकांच्या सहभागातूनच सामाजिक न्यायाची संकल्पना वास्तवात उतरवणे शक्य होईल.

संदर्भ:

1. B. R. Ambedkar, (1936) Annihilation of caste, Navayana Publishing.
2. John Rawls, (1971) A theory of justice, Harvard University Press.
3. D. D. Basu, (2018) Introduction to the Constitution of India (23rd ed.), LexisNexis.
4. M. P. Jain, (2019) Indian constitutional law (8th ed.), LexisNexis.
5. Granville Austin, (1999) Working a democratic constitution: The Indian experience, Oxford University Press.
6. Government of India, (2023) The Constitution of India, Ministry of Law and Justice.
7. Upendra Baxi, (2000) The future of human rights in India, Oxford University Commonwealth Law Journal, 1(2), 1–20.
8. Rajeev Bhargava, (2008) Political secularism and the Indian Constitution, Philosophy & Social Criticism, 34(1–2), 15–38.
9. National Portal of India, (2023) Social justice and empowerment policies in India. https://www.india.gov.in